**ठळक बातम्या**

- इतर देशांवरचं अवलंबित्व हाच भारताचा सर्वात मोठा शत्रू असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन/ गुजरातमधे भावनगर इथं ३४ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या विकास कामांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण आणि भूमीपूजन

- मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गाच्या कामाबद्दल रेल्वेमंत्र्यांनी व्यक्त केलं समाधान

- केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणाच्या दहाव्या अखिल भारतीय परिषदेचं सरन्यायाधीशांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- अखिल भारतीय वरिष्ठ गट बॅडमिंटन मानांकन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत महाराष्ट्राच्या विप्लव कुवळे आणि विराज कुवळे यांना विजेतेपद

**<><><><>**

इतर देशांवरचं अवलंबित्व हाच भारताचा सर्वात मोठा शत्रू असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. गुजरातमधे भावनगर इथे 'समुद्र से समृद्धी' या कार्यक्रमात आज ते बोलत होते. आपलं इतर देशांवरचं अवलंबित्व जेवढं कमी होईल तेवढी आपली शक्ती वाढेल असं ते म्हणाले. समुद्र से समृद्धी या कार्यक्रमामध्ये ३४ हजार २०० कोटी रुपयांच्या विकास कामांचं उद्घाटन केलं. यामध्ये किनारपट्टीशी संबधित ७ हजार ८०० रुपयांच्या प्रमुख विकास प्रकल्पांचा समावेश आहे. यावेळी प्रधानमंत्र्यांनी ६६ हजार कोटी रुपयांचे २१ सामंजस्य करार बंदरे आणि नौवहन मंत्रालयाकडे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सुपूर्द केले. कच्छमधे धोरडो हे गाव पूर्णपणे सौर ऊर्जेचा वापर करीत असून त्याचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांनी केलं. गुजरातमधे यापूर्वी मोढेरा, सुखी आणि मसाली या गावामधेही पूर्णपणे केवळ सौर ऊर्जेचा वापर होतो.

स्वातंत्र्याप्राप्तीच्या शतकपूर्तीपर्यंत म्हणजे २०४७पर्यंत विकसित व्हायचे असेल तर भारताला आत्मनिर्भर होण्याशिवाय पर्याय नाही. या विचारातून भारताचं सागरी क्षेत्र नवीन

सुधारणा करत आहे. प्रशासकीय सुधारणा राबवल्यामुळे बंदर विकास आणि  उलाढाल अधिक सुलभ झाली आहे असं प्रधानमंत्री म्हणाले.

गेल्या अकरा वर्षांमध्ये भारताच्या सागरी किनारपट्टी क्षेत्राने विकासाच्या दृष्टीने मोठं परिवर्तन अनुभवलं आहे असं केंद्रीय बंदरे नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी यावेळी सांगितलं. बंदरांची क्षमता दुप्पट झाली तसंच बंदरातून विक्रमी प्रवासी वाहतूक होऊ लागल्याचं त्यानी नमूद केलं. प्रधानमंत्र्यानी भावनगरला पोचण्यापूर्वी विमानतळापासून जवाहर मैदानापर्यंत रोड शो केला.

**<><><><>**

महत्त्वाकांक्षी अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा २०२७मधे सुरु होईल, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज सांगितलं. या प्रकल्पाचा ठाणे जिल्ह्यातला टप्पा २०२८ च्या दरम्यान पूर्ण होईल आणि त्यानंतर वांद्रे कुर्ला संकुलातल्या टप्प्याचं काम सुरु होईल असं ते म्हणाले.

या बुलेट ट्रेन मार्गावरच्या नवी मुंबईतल्या घणसोली ते शिळफाटा बोगद्याच्या जोडकामाचा आरंभ आज सकाळी वैष्णव यांच्या हस्ते झाला, त्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी हा सांगितलं. घणसोली ते शीळफाटा हा ४ पूर्णांक ९ दशांश किलोमीटर लांबीच्या बोगद्याचा ब्रेकथ्रू हा बीकेसी ते शीळफाटा या समुद्राखालून जाणाऱ्या एकवीस किलोमीटर बोगद्याचा महत्त्वाचा टप्पा आहे. यामध्ये ठाणे खाडीतल्या ७ किलोमीटर भागाचाही समावेश आहे. नवीन ऑस्ट्रीयन टनेलिंग पद्धतीने या बोगद्याच्या ब्रेकथ्रूचं काम करण्यात आलं आहे असंही वैष्णव यांनी यावेळी नमूद केलं.कामाची माहिती देताना ते म्हणाले

**... होल्ड - बाईट- वैष्णव - -**

बुलेट ट्रेनमुळे अहमदाबाद ते मुंबई प्रवासाचा वेळ २ तास ७ मिनिटांवर येईल. तसंच या मार्गावरच्या अनेक महत्त्वाची आर्थिक केंद्रं यामुळे जोडली जातील असा विश्वास, वैष्णव यांनी व्यक्त केला. जपानहून या कामाची पाहणी करण्यासाठी आलेल्या तज्ज्ञ पथकानं कामाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केल्याचं त्यांनी सांगितलं.

बुलेट रेल्वेच्या कामात अनेक ठिकाणी स्वदेशी तंत्रज्ञान, यंत्रसामग्री आणि सुटे भाग वापरले असल्याचं रेल्वेमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><>**

सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरून चालताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. केंद्र सरकारने आरोग्य सेवेसाठी डिजिटल परिसंस्थेला मजबूत केलं असून त्यामुळे आरोग्य सेवेचे लाभ अधिक सुलभतेने मिळत आहेत. अधिक माहिती ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - होल्ड... व्हॉईस कास्ट- -**

*(भारताच्या आरोग्य सेवेत डिजिटल परिवर्तन घडून येत आहे. विविध सरकारी उपक्रम, धोरणात्मक सुधारणा, तांत्रिक प्रगती यांचा एकत्रित परिणाम आरोग्य सेवेवर दिसत आहे. वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि दर्जेदार आरोग्य सेवेची वाढती मागणी यांचा ताळमेळ साधण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०२१ मध्ये आयुष्मान भारत डिजिटल मिशन सुरू केलं होतं. याचा उद्देश खासगी आणि सार्वजनिक क्षेत्राच्या सक्रिय सहकार्यातून एक मजबूत आरोग्य परिसंस्थेची निर्मिती करणं हा आहे. २०२१ ते २०२५ या पाच वर्षांत ८० कोटींहून अधिक आयुष्मान भारत आरोग्य खाती तयार करण्यात आली आहेत, या खात्यांच्या माध्यमातून ७१ कोटींहून अधिक आरोग्य नोंदी घेतल्या गेल्या आहेत. याच अभियानाचा एक भाग असलेला ई-संजीवनी हा एक अत्याधुनिक क्लाउड-आधारित टेलिमेडिसिन प्लॅटफॉर्म आहे. देशभरातल्या आरोग्यसेवा पुरवठादार आणि रुग्णांमध्ये दूरस्थ पद्धतीने वैद्यकीय मदतीसाठीच्या मार्गदर्शनाचा फायदा ई-संजीवनीमुळे मिळाला आहे.)*

**<><><><>**

आंतरराष्ट्रीय किनारा स्वच्छता दिन आणि सेवा पर्व २०२५ च्या निमित्ताने खासदार रविंद्र वायकर यांच्या उपस्थितीत मुंबईत जुहू आणि वर्सोवा चौपाटीवर स्वच्छता मोहिम राबवण्यात आली. जुहू चौपाटीवरच्या महात्मा गांधीच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन स्वच्छता मोहिमेची सुरुवात झाली. मोहिमेच्या वेळी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. स्वच्छता उपक्रमानंतर एक पेड माँ के नाम या अंतर्गत एक झाड वायकरांच्या हस्ते लावण्यात आले. मुंबई महापालिकेने घेतलेल्या चित्रकला आणि घोषवाक्य स्पर्धेतल्या विजेत्यांचा वायकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

**<><><><>**

या उपक्रमांतर्गत आज सकाळी रत्नागिरी तालुक्यातल्या भाट्ये समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता करण्यात आली. जिल्हा प्रशासन, विविध शाळांचे विद्यार्थी आणि विविध कंपन्यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आला. प्लास्टिक पिशव्या टाळण्याचा संदेश देणाऱ्या कापडी पिशव्यांचं वितरण, तसंच नारळाच्या झाडाचं रोप लावण्यात आलं आणि सर्वांनी यावेळी स्वच्छतेची शपथ घेतली.

**<><><>**

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणाच्या दहाव्या अखिल भारतीय परिषदेचं उद्घाटन आज नवी दिल्लीत झालं. शासकीय अधिकाऱ्यांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी न्यायाधीकरण महत्त्वाचं असल्याचं न्यायमूर्ती गवई यावेळी म्हणाले. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरण आपल्या स्थापनेपासून गेल्या चार वर्षांपासून हे काम अव्याहतपणे करत आहे, असं सांगत न्यायाधीकरणाच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

न्यायाधीकरणाचा निकाल योग्य असला तरी अधिकारी अपील दाखल करतात, याचा पुनर्विचार होण्याची गरज आहे, असं कायदे मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी म्हटलं. तर शासकीय कर्मचाऱ्यांना न्याय मिळवण्याच्या प्रक्रियेत सुलभता यावी यासाठी न्यायाधीकरणाची स्थापना झाली आहे, असं केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह म्हणाले.

दरम्यान, न्यायालयीन आणि प्रशासकीय यंत्रणा अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने चर्चा करणं हे या परिषदेचं उद्दिष्ट आहे.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जीवनातल्या संघर्षावर आधारित चलो जीते हैं हा चित्रपट सध्या चित्रपटगृहांमध्ये दाखवला जात आहे. हा चित्रपट आवर्जून पाहावा असं आवाहन पीव्हीआर आयनॉक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौतम दत्ता यांनी केलं आहे...

- **- होल्ड.. बाईट - गौतम दत्ता - -**

**<><><>**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाट्य परिषद करंडकात ‘चिरंजीव परफेक्ट बिघडलाय’ या एकांकिकेनं प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेची अंतिम फेरी मुंबईत

यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात १५ ते १८ सप्टेंबर दरम्यान झाली. विजय केंकरे, चंद्रकांत कुलकर्णी, सुहास जोशी, रविंद्र पाथरे आणि सौरभ पारखे हे अंतिम फेरीचे परिक्षक होते.

**<><><><>**

अखिल भारतीय वरिष्ठ गट बॅडमिंटन मानांकन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत महाराष्ट्राच्या विप्लव कुवळे आणि विराज कुवळे यांनी विजेतेपद पटकावलं. त्यांनी चौथी मानांकित जोडी सिद्धार्थ इलांगो आणि संतोष गजेंद्रन जोडीचा २१-१६, २१-१० असा पराभव केला.

**<><><><>**

आंतरराष्ट्रीय टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये शंभर विकेट्स घेणारा अर्शदीप हा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. अबुधाबी इथं ओमानविरुद्धच्या शेवटच्या साखळी सामन्यात त्याने टी-ट्वेंटीमधला आपला शंभरावा बळी घेतला. अर्शदीपचा हा सदुसष्ठावा आंतरराष्ट्रीय टी-ट्वेंटी सामना होता. अफगाणिस्तानच्या राशिद खानने ५३ सामन्यांमध्ये तर श्रीलंकेच्या वनिंदू हसरंगाने ६३ सामन्यांमध्ये १०० बळींचा विक्रम केला आहे. अर्शदीप हा आंतरराष्ट्रीय टी-ट्वेंटी सामन्यात १०० बळी घेणारा जगातला तिसरा सर्वात जलद गोलंदाज ठरला आहे.

**//<><><><>//**